**ठळक बातम्या**

- मॉरिशसच्या सर्वोच्च नागरी सन्मानानं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा सन्मान, ग्लोबल साऊथसाठी ‘महासागर’ उपक्रमाचीही घोषणा

- जास्त व्याजदर देणाऱ्या योजनांच्या आमिषाला बळी न पडण्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नागरिकांना आवाहन
- जन्म – मृत्यू नोंदणी  प्रमाणपत्र मिळवण्याची प्रक्रीया सुलभ आणि पारदर्शक करण्यासाठी नवे नियम लागू

  **आणि**
- शक्तिपीठ महामार्ग रद्द करण्याच्या मागणीसाठी शेतकऱ्यांचे मुंबईत आंदोलन

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज मॉरिशसच्या राष्ट्रीय दिनाच्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मॉरिशसचे राष्ट्रपती धरमबीर गोखूल यांनी त्यांना मॉरिशसचा सर्वोच्च नागरी सन्मान ‘द ग्रँड कमांडर ऑफ द ऑर्डर ऑफ द स्टार अँड की ऑफ इंडियन ओशन’ या कार्यक्रमात प्रदान केला. भारत - मॉरिशस संबंधात भरीव योगदान दिल्याबद्दल त्यांना गौरवण्यात आलं. हा सन्मान मिळवणारे प्रधानमंत्री मोदी हे पहिले भारतीय आहेत.

मॉरिशसचे प्रधानमंत्री नवीन रामगुलाम यांच्यासोबत त्यांनी आज प्रतिनिधी स्तरावर चर्चा केली. यावेळी स्थानिक चलनात देवाण घेवाण, कर्ज पुरवठा, राजदुतांसाठी प्रशिक्षण, बंदरातल्या व्यवसायाच्या माहितीची देवाणघेवाण, आर्थिक गुन्हे, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्रात सहकार्य, अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण यासारख्या विषयांवर ८ सामंजस्य करार दोन्ही देशात झाले. भारत आणि मॉरिशसमध्ये असलेल्या भागीदारीविषयी ते म्हणाले..

**होल्ड - प्रधानमंत्री नरेंद्र मोदी बाइट**

ग्लोबल साउथसाठी **MAHASAGAR** अर्थात **Mutual and Holistic Advancement for Security and Growth Across Regions** या उपक्रमाची घोषणा त्यांनी यावेळी केली. या अंतर्गत विकासासाठी व्यापार, शाश्वत वृद्धीसाठी क्षमता विकास, परस्पर सुरक्षा यावर भर दिला जाणार आहे. हा दौरा आटोपून प्रधानमंत्री मायदेशी रवाना झाले.

**<><><><><>**

जास्त व्याजदर देणाऱ्या योजनांच्या आमिषाला नागरिकांनी बळी पडू नये. जादा व्याज देणाऱ्या ९९ टक्के योजना या फसव्या असतात, असा सावधगिरीचा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला आहे.

**होल्ड - मुख्यमंत्री बाइट**

अभ्यासक्रमाची पुस्तके मराठीत उपलब्ध होऊ लागल्यानं MPSC कडून घेण्यात येणाऱ्या सर्वच स्पर्धा परीक्षा मराठीमध्ये घेण्याबाबत राज्य शासनाचे नियोजन असल्याची माहिती त्यांनी विधानपरिषदेत दिली. अभियांत्रिकी विषयांची पुस्तके मराठीमध्ये उपलब्ध नसल्यामुळे या परीक्षा इंग्रजी भाषेत घेतल्या जातात, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

कृत्रिम किंवा भेसळीचं पनीर आरोग्यासाठी धोक्याचं असून त्याच्या विक्रेता आणि संबंधितांवर कडक कारवाई करण्यात येईल, असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात सांगितलं. अशा प्रकारची भेसळ ओळखण्यासाठी नवीन प्रयोगशाळा सुरु करण्यासाठी तसंच प्रयोगशाळांचं

बळकटीकरण करण्यासाठी भरीव निधी देऊ, संबंधित नियमांमधे बदल करण्यासाठी संबंधित मंत्र्यांशी चर्चा करु , असं आश्वासन पवार यांनी दिलं.

**<><><><><>**

'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेचे अर्ज तपासणाऱ्या अंगणवाडी सेविका आणि पर्यवेक्षिकांना लवकरच त्यासाठीचा प्रत्येकी ५० रुपये प्रोत्साहन भत्ता दिला जाईल, माहिती महिला आणि बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी आज विधानसभेत दिली. आमदार रोहित पवार, वरुण सरदेसाई यांनी याबाबत प्रश्न विचारला होता. नमो शेतकरी सन्मान योजनेचा लाभ मिळणाऱ्या महिलांना एक हजार रुपये या योजनेतून आणि पाचशे रुपये लाडकी बहीण योजनेतून दिले जातील, असं त्या म्हणाल्या.

**<><><><><>**

जन्म – मृत्यू नोंदणीची प्रमाणपत्र मिळवण्याची प्रक्रीया सुलभ आणि पारदर्शक व्हावी याकरता तसंच बनावट प्रमाणपत्र वितरणाला आळा बसावा म्हणून संबंधित नियमात सुधारणा करण्यात आली आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात निवेदनाद्वारे ही माहिती दिली. याबाबतची अधिसूचना आज जारी झाली असून ती तात्काळ लागू झाली आहे. अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**<u>होल्ड व्हाइस कास्ट</u>**

*आता जन्म आणि मृत्यू प्रमाणपत्र जलद गतीने मिळणार असून चुकीचं प्रमाणपत्र दिल्यास थेट फौजदारी कारवाई करण्यात येणार आहे. अर्जदाराने पुरावे म्हणून जोडलेली कागदपत्रं बनावट आढळल्यास तात्काळ फौजदारी कारवाई करण्यात येईल. जन्म - मृत्यूच्या नोंदणीबाबत एक वर्षापेक्षा अधिक कालावधीने माहिती मिळाल्यास प्राधिकृत दंडाधिकाऱ्याने माहितीच्या अचूकतेबाबत खात्री करुन, विलंब*

*शुल्क आणि इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी आणि नोंद घ्यावी, अशी सुधारणा नियमात झाली आहे.*

*काही परदेशी नागरिकांनी बनावट प्रमाणपत्र मिळवल्याच्या तक्रारी दाखल झाल्या होत्या, त्या पार्श्वभूमीवर जन्म – मृत्यू प्रमाणपत्र जारी करण्यावर गेल्या २१ जानेवारीपासून स्थगिती होती, ती आता हटवली आहे.*

**आकाशवाणी बातम्यांसाठी विधानभवनातून कौस्तुभ पटाईत**

**<><><><><>**

अर्थमंत्री अजित पवार यांनी मांडलेल्या अर्थसंकल्पातून राज्याची प्रगती होत असल्याचं दिसतंय. मात्र राज्याचा कर महसूल कमी झाला आहे, त्याकडे लक्ष देणं गरजेचं असल्याचं माजी अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार म्हणाले. विधानसभेत अर्थसंकल्पावरच्या चर्चेत ते बोलत होते. या अर्थसंकल्पाद्वारे सरकारने अनेक सकारात्मक पावलं उचलली आहेत. मात्र अनेक गोष्टी करायच्या बाकी आहेत. शेतकऱ्यांना कर्जमाफी, वैधानिक विकास मंडळाची स्थापना, पाणंद रस्त्यासाठी निधी या मागण्या त्यांनी केल्या.

मोठ्या मताधिक्याने निवडून आलेल्या महायुती सरकारने अर्थसंकल्पातून जनतेला काहीही दिलं नाही अशी टीका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार वरूण सरदेसाई यांनी केली. विधानसभा निवडणुकीच्या काळात सत्ताधारी पक्षांनी दिलेल्या एकाही आश्वासनाची पूर्तता अर्थसंकल्पात केली नाही असं सरदेसाई म्हणाले.

राज्यात होणारी गुंतवणूक कुठे होणार हे सरकारने स्पष्ट केलं पाहिजे अशी अपेक्षा काँग्रेसचे आमदार अमित देशमुख यांनी व्यक्त केली. शेतीमाल वाहतूक विकास कार्यक्रम सरकारने आखावा, मराठवाडा वॉटर ग्रीड या पाच वर्षांत पूर्ण करावं अशी मागणी त्यांनी केली.

**<><><><><>**

राज्य सरकारने शक्तिपीठ महामार्ग रद्द करावा, अशी मागणी करत १२ जिल्ह्यातल्या शेतकऱ्यांनी आज मुंबईत आझाद मैदानावर आंदोलन केलं. महामार्ग रद्द न केल्यास मोजणी अडवण्यात येईल, तसंच, प्रत्येक जिल्ह्यात मंत्र्यांच्या घरावर मोर्चे काढण्यात येतील असा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे. काँग्रेसचे विधान परिषदेचे गटनेते आमदार सतेज पाटील यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या या मोर्चात हजारो शेतकरी सहभागी झाले होते. विरोधी पक्षातले अनेक नेते यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

शक्तीपीठ महामार्ग करायचा आहे मात्र लादायचा नाही. या महामार्गात जमीन अधिग्रहण होणाऱ्या शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेण्यासाठी चर्चा करू, त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न करू. पण हा महामार्ग महाराष्ट्राच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा असून तो होणारच, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज स्पष्ट केलं. या महामार्गाविरोधात शेतकरी आंदोलन करत असल्याचा मुद्दा विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी उपस्थित केल्यानंतर ते बोलत होते.

**<><><><><>**

रत्नागिरी जिल्ह्यातल्या २४ गावांमध्ये शिमगोत्सवाच्या मानापमानावरून काही वाद होत होते, मात्र पोलिसांनी पुढाकार घेतल्याने २४ पैकी १९ गावांमध्ये सामोपचाराने वाद मिटवण्यात यश आलं आहे. अन्य गावांमध्येही वाद मिटवण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत, अशी माहिती रत्नागिरीचे जिल्हा पोलीस अधीक्षक धनंजय कुलकर्णी यांनी दिली.

**<><><><><>**

येत्या २ दिवसात विदर्भात उष्णतेची लाट येण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. आज अकोल्यात सर्वाधिक ३९ पूर्णांक ५ अंश सेल्सियस तपमानाची नोंद झाली. नाशिक आणि परिसरातही आज तीव्र उष्णता जाणवत होती.